# गोदावरी एक्स्प्रेस सुरू करण्याची संतप्त नाशिककर प्रवाशांची मागणी

■ नाशिक

**कोरोनामुळे** देशभरातील रेल्वेसेवा बंद करण्यात आली होती. मात्र आता कोरोनाचे सावट कमी झाल्यांनंतरही नाशिकहून मुंबईला जाणाऱ्या प्रवाशांची परवड सुरूच असून, मनमाडहून कुर्ल्याला जाणारी गोदावरी एक्स्प्रेस सुरू करण्याची मागणी नाशिककरांकडून होत आहे.

गेल्या तीन वर्षांपासून नाशिकहून मुंबईला जाणाऱ्या चाकरमान्यांचे हाल सुरु आहेत. मनमाडहुन कुर्ल्याला जाणारी गोदावरी एक्स्प्रेस सुरू करण्याची मागणी वारंवार करूनही अद्याप सुरू झाली नाही तर पंचवटी एक्स्प्रेसच्या बोगीही कमी झाल्याने प्रवाशांचे अतोनात हाल होत आहेत. कोरोनाचा प्रादुर्भाव वाढू लागल्याने देशभरातील रेल्वेसेवा बंद होती. यात नाशिककरांची जीवनवाहिनी समजली जाणारी पंचवटी एक्स्प्रेस आणि गोदावरी एक्स्प्रेस या दोन्ही एक्स्प्रेसचा समावेश होता. प्रवाशांनी सातत्याने केलेल्या मागणीमुळे पंचवटी एक्स्प्रेस सुरू करण्यात आली. मात्र, मध्य रेल्वे प्रशासनाने एक्स्प्रेसचे पाच डबे कमी केले. त्यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होत असल्याचे प्रवासी संघटनांनी सांगितले. पंचवटी एक्स्प्रेस एवढ्याच महत्त्वाची मनमाड ते लोकमान्य टिळक टर्मिनसला जाणारी गोदावरी एक्स्प्रेस गेल्या तीन वर्षांपासून बंद असल्याने प्रवाश्यांची दुहेरी कोंडी होत आहे. वारंवार मागणी करूनही गोदावरी एक्स्प्रेस सुरू होत नसल्याने नोकरी, शिक्षणानिमित्ताने मुंबईला जाणाऱ्या प्रवाश्यांचे हाल होत आहेत.

या संदर्भात विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री भारती पवार यांच्याकडे पाठपुरावा केला मात्र सकारात्मक प्रतिसाद मिळाला नसल्याचे प्रवासी संघटनांनी म्हटले आहे. सर्व व्यवहार सामान्य होत असतानाच रेल्वे प्रवासावर लावणारी बंधने दूर करावी अशी मागणी पुन्हा एकदा जोर धरू लागली आहे, येत्या काही दिवसात पंचवटी एक्स्प्रेसच्या बोगी वाढवणे आणि गोदावरी एक्स्प्रेस पूर्ववत सुरू करण्याबाबत निर्णय झाला नाही तर आंदोलन छेडण्याच्या पवित्र्यात संतप्त प्रवासी असल्याचे शक्यता आहे.

# मुंबई महापालिकेत भाजप नगरसेवकाचे पद रद्द!

**मुंबई-** महापालिका प्रभाग क्रमांक १५९ मधून निवडून आलेले भाजप नगरसेवक प्रकाश मोरे यांचे नगरसेवकपद रद्द करण्याचे आदेश लघुवाद न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे याच ठिकाणी




## शिवसेना नगरसेवक संख्या वाढली

दुसऱ्या क्रमांकाची मते मिळालेल्या शिवसेना उमेदवार कोमल जामसांडेकर यांना हे नगरसेवकपद देण्याचे आदेश न्यायालयाने महापालिकेला दिले आहेत.

प्रकाश मोरे यांनी निवडणूक प्रतिज्ञापत्रामध्ये माहिती लपवल्याची तक्रार कोमल जामसांडेकर यांनी केली होती आणि त्यांच्या याच तक्रारीवर निर्णय देताना लघुवाद न्यायालयाने प्रकाश मोरे यांचे नगरसेवकपद रद्द केले आहे. दरम्यान, सध्या मोरे यांच्या वकिलाने या आदेशाविरोधात वेळ मागून घेतला आहे. तसेच कोमल यांना नगरसेवक पद मिळाले तरी आता पालिका निवडणुका काही दिवसातच होणार असल्याने त्यांना नगरसेवक कालावधी अवघ्या काही दिवसांचा मिळणार आहे. कारण ७ मार्चला सभागृहाचा कार्यकाळ संपणार१ असून पालिकेवर प्रशासक नेमला जाणार आहे.



# वरळी -शिवडी उड्डाण पुल कामासाठी जगन्नाथ भातणकर मार्ग वाहतूक बंद

■ मुंबई

**वरळी** -शिवडी इलेव्हेटर कनेक्टर उड्डाण पुलाचे काम लवकरच सुरू होणार आहे. या पार्श्वभूमीवर परळहून प्रभादेवीच्या स्वामी समर्थ मठाच्या दिशेने येणारा जगन्नाथ भातणकर मार्ग काल सोमवारी मध्यरात्रीपासून वाहतुकीस बंद करण्यात आला आहे. एमएमआरडीएच्या माध्यमातून वरळी -शिवडी इलेव्हेटर कनेक्टर उड्डाण पूल बांधण्यात येणार आहे. या पुलाच्या बांधकामासाठी अंदाजे दीड वर्षांचा कालावधी लागू शकतो अशी माहिती एमएमआरडीएच्या वतीने देण्यात आली आहे.

हा मार्ग बंद करण्यात आल्याने पर्यायी व्यवस्था म्हणून, एलफिन्स्टनकडून प्रभादेवी, वरळीकडे येणारी वाहतूक दीपक टॉकीजवरून पुन्हा वरळी आणि प्रभादेवीच्या दिशेने वळविण्यात आली आहे. पुलाच्या कामासाठी एलफिन्स्टनवरून प्रभादेवीला येणारा मार्ग बंद करण्यात आला असून, नागरिकांनी याची नोंद घेऊन सहकार्य करावे असे आवाहन एमएमआरडीएच्या वतीने करण्यात आले.

जगन्नाथ भातणकर मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात येणार असला तरी आणीबाणीच्या काळात रुग्णवाहिकेसाठी एक विशेष मार्गिका ठेवण्यात येणार आहे. रुग्णवाहिके व्यतिरिक्त हा मार्ग पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. लवकरच वरळी -शिवडी इलेव्हेटर कनेक्टर उड्डाणपुलाचे काम सुरू होत आहे. काम सुरू असताना काही दुर्घटना होऊ नये याची खबरदारी म्हणून जगन्नाथ भातणकर मार्ग वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला आहे.

# नगरसेवकांची अनधिकृत जनसंपर्क कार्यालये महापालिका प्रशासनाने धाडल्या नोटिसा

■ पिंपरी, प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड** महापालिकेची आगामी निवडणूक तोंडावर असताना महापालिका आयुक्तांच्या रडारवर नगरसेवकांची अनधिकृत जनसंपर्क कार्यालये आली आहेत. महापालिकेच्या अनधिकृत बांधकाम विभागाने अनधिकृत जनसंपर्क कार्यालय थाटलेल्या सरसकट नगरसेवकांना नोटिसा धाडल्या आहेत. अनधिकृत बांधकामप्रकरणी नगरसेवकपद रद्द होण्यापेक्षा पुढील निवडणूक लढविण्यास अपात्र ठरु नये यामुळे नगरसेवकांमध्ये घबराट निर्माण झाली. नोटिसा मिळताच नगरसेवकांची धावपळ सुरू झाली असून आयुक्तांच्या भेटीगाठी वाढल्या आहेत.

मागील काही वर्षांपासून शहरातील अनधिकृत बांधकामांचा प्रश्न चिघळला आहे. तत्कालीन आयुक्त दिलीप बंड यांनी २३ नगरसेवकांना अनधिकृत बांधकाम प्रकरणी अपात्रतेच्या नोटिसा बजाविल्या होत्या. न्यायालयातही ही बाब गेली होती. आता निवडणुकीच्या तोंडावर याच विषयाने पुन्हा उचल खाल्ली आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेची निवडणूक मुदतीत झाली नाही. नगरसेवकांचा कालावधी १३ मार्च रोजी संपत आहे. आता एप्रिलमध्ये निवडणूक होईल असे बोलले जात आहे. या निवडणुकीच्या काळात अनधिकृत जनसंपर्क कार्यालये थाटणा-या सरसकट नगरसेवकांना महापालिका प्रशासनाने नोटिसा देण्याची कार्यवाही सुरु केली आहे. महापालिकेची २०१७ ची निवडणूक चार सदस्यीय पद्धतीने झाली होती. आता तीनसदस्यीय पद्धतीने होत आहे. त्यामुळे प्रभाग मोठे आहेत.

# आजपासून आझाद मैदानावर अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे धरणे आंदोलन

**मुंबई-** अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधनवाढ, मासिक पेंशन, नवीन मोबाईल, मराठी ॲप, अंगणवाड्यांच्या भाड्यात वाढ, आहाराच्या दरात वाढ आदी मागण्यांसाठी मुंबई, ठाणे, पालघर, रायगड आदी जवळच्या जिल्ह्यांमधील अंगणवाडी कर्मचारी उद्या मंगळवारपासून तीन दिवस आझाद मैदान, मुंबई येथे तीव्र धरणे आंदोलन करणार आहेत. या आंदोलनात मुंबई व ठाणे, पालघर, रायगड जिल्ह्यातील अंगणवाडी कर्मचारी रोज दोनशेच्या संख्येने सहभागी होतील. या आंदोलनात कृती समितीचे सर्व प्रमुख नेते सहभागी होणार आहेत.

आझाद मैदानावरील धरणे आंदोलनाच्या वेळी शिष्टमंडळाला निमंत्रित करून सकारात्मक चर्चा न झाल्यास अंगणवाडी कर्मचारी प्रकल्प, जिल्हा परिषद, विभागीय उपायुक्त कार्यालये आदी ठिकाणी तीव्र आंदोलन करणार आहेत. ज्यामध्ये राज्यातील सर्व अंगणवाडी कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी होतील. विधानसभेचे बजेट सत्र सुरू असताना ९ मार्च रोजी आझाद मैदानावर भव्य मोर्चा काढण्यात येईल. यामध्ये संपूर्ण महाराष्ट्रातून हजारो अंगणवाडी कर्मचारी सामील होतील. देशातील कामगार संघटनांच्या संयुक्त मंचाने मोदी सरकारच्या शेतकरी, कामगार विरोधी धोरणांच्या विरोधात हा संप पुकारला आहे. संयुक्त किसान मंचाने त्याला पाठिंबा दिला आहे.

केंद्रीय बजेटमध्ये अंगणवाडी कर्मचार्यांच्या पदरात काहीच पडलेले नाही. मोदी सरकारच्या काळात बेरोजगारी, महागाई शिगेला पोहोचली आहे. सर्व सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण केले जात आहे. बडे व्यावसायिक मोदींच्या छत्रछायेखाली आपल्यासारख्या सर्वसामान्य माणसाचे बँकेत ठेवलेले कोट्यवधी रुपये बुडवून पळून जात आहेत. याविरोधात हा संप होणार असून सर्व अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी एक दिवस जिल्हा, तालुका पातळीवरील संयुक्त आंदोलनात सहभागी व्हावे व एक दिवस स्थानिक पातळीवर आंदोलन करावे, अशी हाक अंगणवाडी कृती समितीने दिली आहे.


**दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई**
म्युनिसिपल बँक भवन, २४५, पी'डिमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

**निविदा सूचना**

दि म्युनिसिपल को-ऑपरेटीव्ह बँकेत ऑनलाईन पध्दतीने अंतर्गत पदोन्नतीद्वारे भरावयाच्या पदांकरीता परिक्षा घेणे व सरळसेवा भरती प्रक्रिया करण्याकरीता भरती प्रक्रियेचा अनुभव असलेल्या संस्थांकडून Expression of Interest (EOI) मागविण्यात येत आहे. सदर Expression of Interest दि म्युनिसिपल को-ऑपरेटीव्ह बँक, लि. मुंबई, म्युनिसिपल बँक भवन, २४५ पी'डिमेलो रोड, फोर्ट - मुंबई-४०० ००१ या पत्त्यावर सीलबंद निविदा "Expression of Interest For Empanelment of Recruitment Agency/ Organisation" या नावाने दिनांक ०८.०३.२०२२ दुपारी १.०० वाजेपर्यंत पाठविणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी व निविदा दस्तऐवज (Document) डाऊनलोड करण्यासाठी बँकेच्या www.municipalbankmumbai.com या संकेतस्थळावर भेट द्यावी.

ठिकाण :- मुंबई
तारीख:- २२.०२.२०२२ महाव्यवस्थापक



**संजीवनी एस. आर. ए. सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्यादित)**
इमारत क्र. ७/ब, सी.टी.एस. नं.१३ पार्ट, गोळीबार रोड, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई-४०००५५
नोंदणी क्र. एम.यू.एम./एस.आर.ए/एच.एस.जी./(टी.सी.)/१२२३६/२०१२ दिनांक ०१-०८-२०१२

**जाहीर नोटीस**

खालील सभासदांचे निधन त्या त्या तारखेला झाले आहे त्यांच्या नावा समोर नमूद केलेल्या वारसानी त्यांची सदनिका/ गाळा तसेच भागभांडवल आपले नावे हस्तांतरित करण्यासाठी संस्थेकडे विहित नमुन्यात अर्ज केलेले आहेत. सदरहू मृत सभासदानी नामनिर्देशित केलेले आहे / नाही.

| अ.क्र | सभासदाचे नाव | मृत्यूची तारीख | रूम न. | वारस अर्जदाराचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | रघुपती जंगबहादुर मिश्रा | ०५/०२/२०२१ | ५१४ | सुरेन्द्रकुमार रघुपती मिश्रा |
| २ | हिरालाल भगवती प्रसाद गुप्ता | ०९/०५/२०२१ | १४१३ | रामाजियाई हिरालाल गुप्ता |
| ३ | धोंडू सीताराम गिरकर | ०४/०२/२०२१ | १११३ | सुनील धोंडू गिरकर |
| ४ | विष्णु बाबाजी सकपाळ | १८/११/२०१४ | ३०३ | विलास विष्णु सकपाळ<br>संदीप विष्णु सकपाळ |
| ५ | के. के. विजयन | ०४/०१/२०२२ | १२१५ | सुनीता विजयन |
| ६ | कल्पना महादेव शिंदे | ०८/०७/२०२१ | १११६ | शैलेश महादेव शिंदे |
| ७ | सुभाष विठोबा चव्हाण | १४/०८/२०२१ | ६०३ | शुभांगी सुभाष चव्हाण |

संस्था या नोटीसीद्वारे संस्थेच्या भांडवलात / मालमत्तेत असलेले मयत सभासदांचे भाग व हितसंबंध हस्तांतरीत करण्यासंबंधी मयत सभासदांचे वारसदार किंवा त्यांचे अन्य मागणीदार / हरकतदार यांच्याकडून हक्क, मागण्या / हरकती मागविण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १४ दिवसांत त्यांनी आपल्या मागण्याच्या व हरकतीच्या पृष्टर्थ आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रति व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत कोणतीही व्यक्तिकडून हक्क मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाही तर मयत सभासदांचे संस्थेच्या भांडवलातील / मालमत्तेतील भाग व हितसंबंध त्यांच्या हस्तांतरणा बाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर असा कोणी हक्क मागण्या / हरकती आल्या तर त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधीची एक प्रत मागणीदारास / हरकतदारास पाहण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांच्याकडे सायंकाळी ०७:३०ते ०९:०० पर्यंत दिल्याच्या तारखेपासून नोटीसची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

सही
संजीवनी एस. आर. ए. सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्यादित)
दिनांक: २३/०२/२०२२ सेक्रेटरी



**PUBLIC NOTICE**

This is to bring to your kind notice that **M/S. PUSHPA ENTERPRISES** (Closure of Business) having **RC.No.B-0434/MUM/PER/ 1000+/5/2158/1987.** Date of issue **24/11/1987,** valid up to **25/ 05/2018** have decided to close the said business with immediate effect.

In the event there is any complaint against us the same may be referred to within 30 days of the publication of the notice, Copies of the complaint may be sent to The Protector General of Emigrants, Ministry of External Affairs, Government of India, Akbar Bhavan, Satya Marg, Chanakyapuri, New Delhi – 110 021.

**Yours Faithfully,**
**M/S. PUSHPA ENTERPRISES**
**Sd/-**
**JOSEPH JOHN D'COSTA**
**(PROPRIETOR)**
**Place : Mumbai**
**Date : 18/02/2022**


# हिमाचल प्रदेशात फटाक्यांच्या कारखान्यात स्फोट सात जण मृत

■ उना

**हिमाचल** प्रदेशमधील उना जिल्ह्यामध्ये एका फटाक्याच्या कारखान्यामध्ये आज दुपारी भीषण मोठा स्फोट झाला. या स्फोटामध्ये सात महिलांचा होरपळून मृत्यू झाला आहे. तर १० ते १५ महिला जखमी झाल्या आहेत.जखमींना उपचारासाठी तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. स्फोट झाल्यानंतर तातडीने या ठिकाणी मदतकार्य सुरु करण्यात आले होते.

मिळालेल्या माहितीनुसार उना येथील हरोलीमधील टाहलीवाल येथील फटाक्यांच्या कारखान्यामध्ये हा स्फोट झाला. या स्फोटामुळे कारखान्याला आग लागली आणि त्यामध्ये सात महिला कर्मचाऱ्यांचा होरपळून मृत्यू झाला. स्फोट झाला तेव्हा कारखान्यामध्ये ३० ते ३५ कर्मचारी काम करत होते, अशी माहिती जखमींपैकी एका महिलेने दिली. मृत पावलेल्यांमध्ये एका तीन वर्षाच्या मुलीचाही समावेश असून कामगार असणाऱ्या आपल्या आईसोबत ही मुलगी कारखान्यात आली असे सांगण्यात येत आहे.

# २५ आणि २६ फेब्रुवारीला हेटवणे जलशुध्दीकरण केंद्र बंद

■ मुंबई

**सिडकोच्या** हेटवणे पाणी पुरवठा योजने अंतर्गत असलेल्या वाहिनीवर महावितरणकडून होणार्या विजेचा पुरवठा त्यांच्या जिते येथील उपकेंद्राच्या दुरुस्ती व देखभालीच्या कामांमुळे बंद करण्यात येणार असल्याने सिडकोचे हेटवणे जल शुध्दीकरण केंद्र बंद राहणार आहे. यामुळे द्रोणागिरी, उलवे, खासघर नोडसह हेटवणे जलवाहिनीद्वारे करण्यात येणार्या गावांचा पाणी पुरवठा शुक्रवार २५ फेब्रुवारी २०२२ सकाळी १० वा.पासून ते शनिवार २६ फेब्रुवारी २०२२ सकाळी १० वाजेपर्यंत बंद राहणार आहे. तरी संबंधित नोड आणि गावांतील नागरिकांनी पाणी साठवण्याची योग्य ती व्यवस्था करावी व सदर कालावधी दरम्यान पाण्याचा जपून वापर करावा, असे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले आहे.

# बाबा राम रहिमला 'झेड प्लस' सुरक्षा

■ चंदिगड

**माजी** पत्रकार रामचंद्र छत्रपतीची हत्या आणि डेरा सच्चा सौदाच्या दोन महिला शिष्यांवर बलात्कार या प्रकरणांत जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या बाबा गुरमीत राम रहीमची नुकतीच पॅरोलवर सुटका झाली आहे. त्याला खलिस्तानी अतिरेक्यांकडून धोका असल्यामुळे हरियाणा सरकारने पॅरोलवर सुटलेल्या बाबा राम रहीमला झेड प्लस दर्जाची सुरक्षा व्यवस्था दिली आहे. त्यावरून आता पुन्हा उलट-सुलट चर्चा सुरू झाली आहे. पत्रकाराची हत्या आणि शिष्यांवरील बलात्कार प्रकरणात सीबीआयच्या विशेष न्यायालयाने २०१७ मध्ये बाबा राम रहीमला दोषी ठरवले होते. या प्रकरणात न्यायालयाने त्याला जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. रोहतकच्या सुनारिया कारागृहात तो शिक्षा भोगत आहे. त्याला ७ फेब्रुवारीला २१ दिवसांच्या पॅरोलवर सोडले. तेव्हा त्याला आलिशान कारमधून कडेकोट बंदोबस्तात गुरुग्रामला पोहोचवले. ६ मोटारींच्या या ताफ्यात पोलीस गाड्यांचाही समावेश होता. बाबा राम रहीम ज्या गाडीत होता.


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग,**
प्रशासकीय इमारत, १ला मजला, भवन्स कॉलेज जवळ, दादाभाई रोड, अंधेरी (प.), मुंबई- ४०००५८.
E-mail-northmumbai.ee@mahapwd.gov.in दुरध्वनी क्रमांक:०२२-२६२३१९६४ फॅक्स - २६२०५७८८

**निविदा सुचना क्र.७५ सन २०२१-२२**

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उत्तर मंबई (सा.बां.) विभाग, दादाभाई मार्ग, भवन्स कॉलेज जवळ अंधेरी (प) मुंबई-४०००५८ (दुरध्वनी/फॅक्स क्रमांक- २६२३१९६४/२६२०५७८८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. **निविदा कागदपत्र दिनांक- २२/०२/२०२२ ते दिनांक- ०८/०३/२०२२ कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई** यांचे कार्यालयात उपलब्ध असतील. तसेच दिनांक-**०९/०३/२०२२** दुपारी **१५.००** वाजेपर्यंत निविदा स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास त्याच दिवशी निविदा उघडण्यात येतील. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उत्तर मंबई (सा.बां.) विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | विशेष दुरुस्ती अंतर्गत २२४ एस.आर.पी.एफ. पोलीस वसाहत, टाईप-२, इमारत क्र. ३६ डी, ग्रुप-८ गोरेगाव (प.) येथे गिलावा, रंगकाम तसेच पाणीपुरवठा व मलनिसारण वाहिन्यांची दुरुस्ती करणे. | ६०१४३२.०० |
| २ | विशष दुरुस्ती अंतर्गत ४० पोलीस वसाहत इमारत क्र. १०. शास्त्री नगर, गोरेगाव येथे गिलावा, रंगकाम तसेच पाणीपुरवठा व मलनिसारण वाहिन्यांची दुरुस्ती करणे. | ६००९६३.०० |
| ३ | विशेष दुरुस्ती अंतर्गत १५६ पोलीस वसाहत टाईप-१,२,३,४, कांदिवली (प.) येथे गिलावा, रंगकाम तसेच पाणीपुरवठा व मलनिसारण वाहिन्याची दुरस्ती करणे. | ६०१२८८.०० |
| ४ | विशेष दुरुस्ती अंतर्गत ४० पोलीस वसाहत इमारत क्र. बी-१व बी-२, बोरीवली (प.) येथे गिलावा, रंगकाम तसेच इ. कामे करणे. | ६००८१३.०० |
| ५ | विशेष दुरुस्ती अंतर्गत एस.आर.पी.एफ. वसाहत येथील युनीट क्र. २३ रुग्णालय बॅरेक येथे गिलावा, रंगकाम तसेच पाणीपुरवठा व मलनिसारण वाहिन्याची दुरुस्ती करणे. | ५७४४०४.०० |
| ६ | विशेष दुरुस्ती अंतर्गत महात्मा फुले मुलांचे वसतीगृह क्र.२. जोगेश्वरी (प.) येथे गिलावा, रंगकाम तसेच पाणीपुरवठा व मलनिसारण वाहिन्यांची दुरुस्ती करणे. | ३००८२७.०० |
| ७ | विविक्षित दुरुस्ती अंतर्गत ३२, पोलीस उप निरिक्षक निवासस्थाने, कार्टर रोड, वांद्रे (पू), मुंबई येथे दरवाजे, खिडक्या व पाईपलाईन दुरुस्ती करणे. | ८८३७७५.०० |
| ८ | विशेष दुरुस्ती अंतर्गत इमारत क्र. १० शास्त्री नगर गोरेगांव येथे गिलावा व रंगकाम करणे. | ८६४०००.०० |
| ९ | विशेष दुरुस्ती अंतर्गत मालवणी मालाड येथील ६० खाटांचे सामान्य रुग्णालय येथे गिलावा, रंगकाम तसंच पाणीपुरवठा व मलनिसारण वाहिन्यांची दुरुस्ती करणे. | ५७४७९९.०० |
| १० | विशेष दुरुस्ती अंतर्गत सशस्त्र पोलीस दल, डी.सी.पी. ऑफीस बॅरेक क्र.८ मधील प्रसाधन गृहामधील फरशीची दुरुस्ती करणे. | ८७९५९०.०० |
| ११ | विशेष दुरुस्ती अंतर्गत सशस्त्र पोलीस दल, डी.सी.पी. ऑफीस बॅरेक क्र.९ मधील दरवाजे, खिडक्या व आभासी छप्पर, फर्निचरची दुरुस्ती करणे. | ७९९७३०.०० |
| १२ | विशेष दुरुस्ती अंतर्गत सशस्त्र पोलीस दल, डी.सी.पी. ऑफीस बॅरेकमधील गिलावा व रंगकाम करणे व जल वाहिन्यांची दुरुस्ती करणे. | ७४९८८५.०० |
| १३ | विशेष दुरुस्ती अंतर्गत उप पोलीस आयुक्त निवासस्थान, वॉटरफिल्ड रोड, वांद्रे (प.), मुंबई येथे गिलावा रंगकाम व फर्निचर इ.कामे करणे. | ८८२१७६.०० |
| १४ | विशेष दुरस्ती अंतर्गत पंतनगर पोलीस स्टेशन येथे बाहय गिलावा व रंगकाम करणे. | ८८३८०९.०० |
| १५ | विशेष दुरुस्ती अंतर्गत पंतनगर पोलीस स्टेशन येथे आतील रंगकाम व पाईपलाईनची दुरुस्ती करणे. | ८८१२११.०० |
| १६ | विशेष दुरुस्ती अंतर्गत पंतनगर पोलीस स्टेशन येथे आतील गिलावा व लादीकरण करणे. | ८८४०५७.०० |
| १७ | विशेष दुरुस्ती अंतर्गत पंतनगर पोलीस स्टेशन येथे दरवाजे, खिडक्या, एम.एस.ग्रील व ॲल्युमिनिअम ग्रील बसविणे. | ८८२०३७.०० |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई(सा.बां) विभाग, अंधेरी (प.) मुंबई ५८.यांनी राखून ठेवला आहे.अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

सही/-
**कार्यकारी अभियंता**
उत्तर मुंबई (सा.बां) विभाग,
अंधेरी (प.) मुंबई ५८.

जा.क्र.काअ/उमुवि/निविदा/१४६५
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग, प्रशासकीय इमारत, १ला मजला,
भवन्स कॉलेजजवळ, दादाभाई मार्ग,
अंधेरी (प.) मुंबई ५८.
दिनांक : १७ फेब्रु. २०२२
आरओसी-२०२१-२२/क्र.-५/ सी ४५८२



**फॉर्म क्र. INC-26**
प्रादेशिक निर्देशक, भारत सरकार, कंपनी व्यवहार मंत्रालय, पश्चिम विभाग, मुंबई यांचे समोर, एव्हरेस्ट, ५ वा मजला, १००, मरीन ड्राईव्ह, मुंबई, महाराष्ट्र- ४०० ००२.

कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३ (४) व कंपनी (नोंदणीकरण) नियम २०१४ च्या नियम ३०(५) (अ) च्या बाबतीत अहम हौसिंग फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड., जिचे नोंदणीकृत कार्यालय, बी-२१४, अर्जुन सेन्टर, गोवंडी स्टेशन रोड, गोवंडी, मुंबई, महाराष्ट्र, ४०० ०८८, CIN:U65922MH2017PTC302010 येथे आहे या बाबतीत

_____ अर्जदार.

**जाहीर सूचना**

ह्याद्वारे सर्वसामान्य लोकांना सूचना देण्यात येते की अर्जदार, प्रादेशिक निर्देशक, कंपनी व्यवहार मंत्रालय, पश्चिम विभाग,भारत सरकार, मुंबई यांच्याकडे, कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३ अन्वये कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय, महाराष्ट्र राज्यातून, तामिळनाडू राज्यात स्थानांतरित करण्याबाबत, दि. ०१ फेब्रुवारी, २०२२, रोजी तिच्या सभासदांच्या झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत संमत केलेल्या ठरावानुसार, कंपनीच्या मेमोरँडम् ऑफ असोसिएशन मधील कलमाच्या दुरुस्तीस स्थायिकरण मिळण्याबाबत एक अर्ज करू इच्छितात. उपरोक्त अर्जामुळे जर कोणत्याही व्यक्तीस काही आक्षेप असल्यास, वा त्याच्या हितास काही बाधा येत असल्यास ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसात अशा व्यक्तींनी आपला आक्षेप, हितसंबधाचे स्वरूप आणि विरोधाची पार्श्वभूमी, यांचेसह MCA-21 (www.mca.gov.in) , या संकेतस्थळावर गुंतवणूकदारांच्या तक्रारी या प्ररुपाखाली अथवा, प्रादेशिक निर्देशक, कंपनी व्यवहार मंत्रालय, पश्चिम विभाग, भारत सरकार, एव्हरेस्ट, ५ वा मजला, १०० मरीन ड्राईव्ह, मुंबई, महाराष्ट्र - ४०० ००२, भारत, यांच्याकडे लिखित स्वरूपात, नोंदणीकृत टपालाने प्रतिज्ञापत्रसह पाठवावा, वा पाठविण्याची व्यवस्था करावी, आणि त्याची एक प्रत वर नमूद केलेल्या, अर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयात पाठवावी.

दि : २३/२/२०२२
स्थळ : मुंबई

**अहम हौसिंग फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड.; यांचेकरिता**
स्वाक्षरी
**वेंकटेश कन्नपन**
**व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी आधिकारी**
**DIN: ०८६२०९५४**



**नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ अन्वये ई लिलाव विक्री सूचना**
**केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)**
सीआयएन: U45400MH2007PTC234297
नोंद. कार्या.: स्वस्तिक चेंबर्स, ६ वा मजला, शीव तुर्भे मार्ग, चेंबूर, मुंबई महा. ४०००७१.
लिलावाचा दिनांक आणि वेळ: दि. २१.०३.२०२२ रोजी स. ११.०० ते दु. ०२.०० पर्यंत
(प्रत्येकी ५ मिनिटे अमर्यादित विस्तारासह)

मान. राष्ट्रीय कंपनी कायदे न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांच्याद्वारे दि. २७.१२.२०१९ रोजीच्या आदेशानुसार नियुक्त परिसमापकांद्वारे बनविण्यात आलेल्या परिसमापन संपत्तीचा भाग असलेल्या केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेड (कॉर्पोरेट ऋणको)च्या मालमत्तांची विक्री. मालमत्तांची विक्री निम्नस्वाक्षरीकारांद्वारे ई-लिलाव प्लॅटफॉर्म https://ncltauction.auctiontiger.net द्वारे करण्यात येईल. लिलाव करण्यात येणाऱ्या मालमत्तांचा तपशील, त्यांची राखीव किंमत, ईएमडी रक्कम आणि वाढीव बोली खालील तक्त्यामध्ये देण्यात आल्या आहेत:

| मालमत्ता | राखीव किंमत (रु.मध्ये) | ईएमडी रक्कम (रु.मध्ये) व तिच्या सादरीकरणाची वेळ | बोलीची विस्तार रक्कम (रु.मध्ये) |
|---|---|---|---|
| केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेड, गाव आणि पो.ऑ. गडोता, तहसिलः दुडू, अजमेर रोड, जिल्हाः जयपूर, राजस्थान - ३०३००८ ("लिलाव ठिकाण") येथे स्थित कॉर्पोरेट ऋणकोची मालमत्ता. मालमत्तेशी संबंधित अधिक तपशील आणि लिलावाच्या अटी आणि शर्तीकरिता, कृपया कॉर्पोरेट ऋणकोची वेबसाईट https://ksspetron.in/liquidation.html येथे उपलब्ध प्रक्रिया दस्तऐवज पहा. | ५,९२,४८,७१५/- | ५९,२४,८७०/- दि. २३.०२.२०२२ ते दि. ०५.०३.२०२२ | रु. २०,००० किंवा त्यापेक्षा जास्त |

टीपा:
१) ई-लिलावाद्वारे मालमत्तांची विक्री **"जसे आहे जेथे आहे तत्त्वावर", "जसे आहे जे आहे तत्त्वावर", "तेथे जे आहे"** आणि **"कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर"** करण्यात येईल.
२) लिलावाच्या ठिकाणी असलेल्या पेट्रॉन इंजिनियरिंग कन्स्ट्रक्शन लिमिटेड (परिसमापनामध्ये)च्या मालमत्तांसोबत संयुक्तपणे केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेडच्या मालमत्तांचा ई-लिलाव करण्याच्या उद्देशाने सदर जाहीर सूचना पारित करण्यात येत आहे. संभाव्य बोलीदार पीईसीएलच्या संदर्भातील जाहीर सूचना आणि प्रक्रिया कागदपत्रे त्यांच्या प्रक्रिया विशिष्ट वेबसाईट म्हणजेच http://petronengineering.com/liquidation-process/liquidation-process येथे प्राप्त करू शकतील.
३) कोणत्याही अधिक माहिती किंवा स्पष्टीकरणाकरिता, तुम्ही परिसमापक यांना ०११-४९१२१६४४-४५ येथे किंवा त्यांचे संघ सदस्य, श्री. दिविश अहुजा यांना +९१ ८८६०५८८२०९ किंवा श्री. विनोद सिंग यांना +९१ ९७८३४४४४७६ येथे संपर्क साधावा.

केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये) करिता
सही/-
सीएस विनीत के. चौधरी
परिसमापक
केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रकरणात
आयबीबीआय नोंदणीकरण क्र.: IBBI/IPA-002/IP-N00103/2017-18/10246
liquidatorksspetron@vkcindia.com (प्रक्रिया विशिष्ट)
ip.vineetchaudhary@gmail.com (आयबीबीआयकडे नोंदणीकृत)
परिसमापकाचा आयबीबीआयकडे नोंदणीकृत पत्ता:
डी-३८, एलजीएफ (एल/एस), दक्षिण विस्तार, भाग-II, नवी दिल्ली-११००४९
दिनांक: २३.०२.२०२२
ठिकाण: नवी दिल्ली



**नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ अन्वये ई लिलाव विक्री सूचना**
**पेट्रॉन इंजिनियरिंग कन्स्ट्रक्शन लिमिटेड (परिसमापनामध्ये)**
सीआयएनः L45202MH1976PLC019135
नोंद. कार्या.: स्वस्तिक चेंबर्स, ६ वा मजला, शीव तुर्भे मार्ग, चेंबूर, मुंबई महा. ४०००७१.
लिलावाचा दिनांक आणि वेळ: दि. २१.०३.२०२२ रोजी स. ११.०० ते दु. ०२.०० पर्यंत
(प्रत्येकी ५ मिनिटे अमर्यादित विस्तारासह)

मान. राष्ट्रीय कंपनी कायदे न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांच्याद्वारे दि. २३.०१.२०२० रोजीच्या आदेशानुसार नियुक्त परिसमापकांद्वारे बनविण्यात आलेल्या परिसमापन संपत्तीचा भाग असलेल्या पेट्रॉन इंजिनियरिंग कन्स्ट्रक्शन लिमिटेड (कॉर्पोरेट ऋणको)च्या मालमत्तांची विक्री. मालमत्तांची विक्री निम्नस्वाक्षरीकारांद्वारे ई-लिलाव प्लॅटफॉर्म https://ncltauction.auctiontiger.net द्वारे करण्यात येईल. लिलाव करण्यात येणाऱ्या मालमत्तांचा तपशील, त्यांची राखीव किंमत, ईएमडी रक्कम आणि वाढीव बोली खालील तक्त्यामध्ये देण्यात आल्या आहेत:

| मालमत्ता | राखीव किंमत (रु.मध्ये) | ईएमडी रक्कम (रु.मध्ये) व तिच्या सादरीकरणाची वेळ | बोलीची विस्तार रक्कम (रु.मध्ये) |
|---|---|---|---|
| केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेड, गाव आणि पो.ऑ. गडोता, तहसिलः दुडू, अजमेर रोड, जिल्हाः जयपूर, राजस्थान - ३०३००८ ("लिलाव ठिकाण") येथे स्थित कॉर्पोरेट ऋणकोची मालमत्ता. मालमत्तेशी संबंधित अधिक तपशिल आणि लिलावाच्या अटी आणि शर्तीकरिता, कृपया कॉर्पोरेट ऋणकोची वेबसाईट http://petronengineering.com/liquidation-process/liquidation-process येथे उपलब्ध प्रक्रिया दस्तऐवज पहा. | १९,४६,०३७/- | १,९४,६००/- दि. २३.०२.२०२२ ते ०५.०३.२०२२ | रु. २०,००० किंवा त्यापेक्षा जास्त |

टीपा:
१) ई-लिलावाद्वारे मालमत्तांची विक्री **"जसे आहे जेथे आहे तत्त्वावर", "जसे आहे जे आहे तत्त्वावर", "तेथे जे आहे"** आणि **"कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर"** करण्यात येईल.
२) लिलावाच्या ठिकाणी असलेल्या केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये) च्या मालमत्तांसोबत संयुक्तपणे पेट्रॉन इंजिनियरिंग कन्स्ट्रक्शन लिमिटेडच्या मालमत्तांचा ई-लिलाव करण्याच्या उद्देशाने सदर जाहीर सूचना पारित करण्यात येत आहे. संभाव्य बोलीदार केएसएसच्या संदर्भातील जाहीर सूचना आणि प्रक्रिया कागदपत्रे त्यांच्या प्रक्रिया विशिष्ट वेबसाईट म्हणजेच https://ksspetron.in/liquidation.html येथे प्राप्त करू शकतील.
३) कोणत्याही अधिक माहिती किंवा स्पष्टीकरणाकरिता, तुम्ही परिसमापक यांना ०११-४९१२१६४४-४५ येथे किंवा त्यांचे संघ सदस्य, श्री. दिविश अहुजा यांना +९१ ८८६०५८८२०९ किंवा श्री. विनोद सिंग यांना +९१ ९७८३४४४४७६ येथे संपर्क साधावा.

पेट्रॉन इंजिनियरिंग कन्स्ट्रक्शन लिमिटेड (परिसमापनामध्ये) करिता
सही/-
सीएस विनीत के. चौधरी
परिसमापक
पेट्रॉन इंजिनियरिंग कन्स्ट्रक्शन लिमिटेडच्या प्रकरणात
आयबीबीआय नोंदणीकरण क्र.: IBBI/IPA-002/IP-N00103/2017-18/10246
liquidatorpecl@vkcindia.com (प्रक्रिया विशिष्ट)
ip.vineetchaudhary@gmail.com (आयबीबीआयकडे नोंदणीकृत)
परिसमापकाचा आयबीबीआयकडे नोंदणीकृत पत्ता:
डी-३८, एलजीएफ (एल/एस), दक्षिण विस्तार, भाग-II, नवी दिल्ली-११००४९
दिनांक: २३.०२.२०२२